## प्रकरण तिसरे

### अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप

### या संस्थेची वाढ (१९७०-७१ ते १९८५-८६ )

## प्रकरण तिसरे

## अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप या संस्थेची वाढ
## ( १९७०-७१ ते १९८५-८६ )

अंकलखोप हे सांगली जिल्हयातील एक प्रगत गाव समजले जाते. राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्टया या गावाचा विकास तुलनात्मकदृष्टया अधिक झालेला आहे. अंकलखोप गावची कांही प्रमुख वैशिष्टये खालीलप्रमाणे सांगता येतील:-

१) अंकलखोप गांवची लोकसंख्या सुमारे १०,००० इतकी आहे. गावातील सुमारे ८५ टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे.

२) गावचे एकूण भौगोलिक क्षेत्र १९०२ हेक्टर आहे. यापैकी लागवडीखालील क्षेत्र १७७८ हेक्टर आहे. शेतीखालील एकूण क्षेत्रापैकी १०१० हेक्टर जमिनीला पाणीपुरवठा केलेला आहे त्यामुळे या जमिनीमध्ये बागाईत पिके घेतली जातात. उरलेली ७६८ हेक्टर जमिन जिराईत पिकाखाली आहे म्हणजेच ५६.८० टक्के जमिन सिंचनाखाली आहे.

३) गांवचे उत्तर, पूर्व आणि दक्षिण या तिन्ही बाजूने कृष्णा नदी वाहते त्यामुळे बहुतेक बागाईत शेतीला नदीपासूनच पाणीपुरवठा केला जातो. याशिवाय सुमारे २३१ इतक्या विहीरी आहेत. त्यांचेपासूनही कांही प्रमाणात पाणीपुरवठा होतो. शेतीच्या पाणी पुरवठयासाठी ६ मोठया सहकारी उपसा जलसिंचन योजना आहेत. याबरोबरच सुमारे ३५० इतक्या खाजगी उपसा जलसिंचन योजना आहेत.

४) ऊस आणि ज्वारी हीच प्रमुख पीके आहेत. ७९० हेक्टर जमिनीमध्ये ऊसाचे तर ५२० हेक्टर जमिनीमध्ये ज्वारीचे पीक घेतले जाते. याशिवाय

भुईमुग, गहू, भात, कडधान्ये या पीकांचेही उत्पादन घेतले जाते. द्राक्षे पानमळे, केळी, पेरू, संत्री, डाळींब, नारळ, गुलाब अशा फळांचे व फुलांचे उत्पादनाखालीही कांही जमिन आहे. अंकलखोप गावामधून " शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,सांगली " या साखर कारखान्यास दरवर्षी अंदाजे ९० हजार टन इतका ऊस पुरविला जातो.

५) शेतीसाठी लागणारी रासायनिक खते, बी-बीयाणे, जंतुनाशके, पॅकींग साहित्य (द्राक्षा व गुलाब यासाठी लागणारे) यांचा क बहुतांशी पुरवठा अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेमार्फतच केला जातो.यासाठी संस्थेकडे खालील दोन सरकारी खत कंपन्यांची एजन्सी आहे.

अ) राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझार्स लि.,मुंबई.
ब) कृषिउद्योग विकास महामंडळ,लि.,मुंबई.

६) शेतीला पुरक व्यवसाय म्हणून दूधपुरवठा व कोंबडीपालन हे दोन व्यवसाय मोठया प्रमाणात केले जातात. गावातून दररोज सुमारे ५००० लिटर दूधाचा पुरवठा केला जातो. दूधसंकलन व विक्री या कार्यासाठी:-


१) गोपालक सहकारी दूध उत्पादक व पुरवठा संस्था लि.,अंकलखोप, आणि,
२) श्रीकृष्ण सहकारी दूधपुरवठा संस्था लि.,अंकलखोप.

अशा दोन सहकारी संस्था आहेत.

अंकलखोप गांवात सुमारे ४० मोठे पोल्ट्री फार्मस् आहेत. सभासदांच्या आर्थिक उन्नती बरोबरच शेती विकासाला या व्यवसायांचा उपयोग होत आहे.

७) अंकलखोप गावामध्ये पुढील बँकाच्या शाखा बँकव्यवसाय करीत आहेत:-

१) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली.
२) दि सांगली बँक लि.,सांगली.
३) शेतकरी सहकारी बँक लि.,सांगली.
४) आष्टा पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.,आष्टा.


तासगांव तालुका
अंकलखोप सोसायटीचे कार्यक्षेत्र
तासगांव
भिलवडी
कृष्णा नदी
अंकलखोप
० ४ मैल
तालुक्याचे ठिकाण
अंकलखोप गांव
रस्ते
रेल्वेमार्ग
नदी
तालुका सरहद्द
अंकलखोप सोसायटीचे कार्यक्षेत्र

वरील बँकामुळे गावातील लोकांच्या आर्थिक व्यवहारास चांगली मदत झाली आहे. याबरोबरच अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेलाही या बँकामुळे मदत होते. गांवातील लोकांच्या या बँकामध्ये सुमारे एक कोटी रू.चे वर ठेवी आहेत. अशा बँकाशिवाय गांवामध्ये पुढील तीन नागरी सहकारी पतसंस्थाही कार्यकरीत आहेत:-

१) कै.दादासाहेब पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,अंकलखोप.

२) महावीर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अंकलखोप.

३) कै.शंकरबुवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,अंकलखोप.

८) अंकलखोप हे गांव तासगांव, इस्लामपूर, आष्टा, सांगली या नजीकचे शहारांशी पक्या रस्त्यामुळे जोडले गेले आहे. या गांवामध्ये स्वतंत्र टेलिफोन एक्स्चेंज आहे. यामुळे दळणवळणाचेदृष्टीने सुव्यवस्था आहे.

९) सहकारी संस्थेला आणि गावाला योग्य, निस्वार्थी, निष्ठावंत आणि कर्तत्वान नेतृत्व मिळाले तर संस्थेच्या, सभासदांच्या आणि गावाच्या विकासात कशी भर पडते याचे अंकलखोप हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था तसेच गावातील श्री.दिनकरराव हिंदूराव पाटील, अध्यक्ष, अंकलखोप शिक्षण निधी समिती, श्री.धुळाप्पाण्णा भाऊराव नवले, सचिव, स्वातंत्र्य सैनिक संग्राम समिती, श्री.वाजीराव रामराव पाटील, चेअरमन, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली व व्हाईस चेअरमन शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,सांगली यांचे नेतृत्व लाभले आहे. १९६० नंतरच्या काळातील अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेची वाढ व विकास करण्यात या नेत्यांचा महत्वपूर्ण हिस्सा आहे. संस्थेबरोबरच अंकलखोप गावच्या सर्वांगिण विकासामध्येही यांचा मोठा सहभाग आहे.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप या संस्थेची १९७१ ते १९८६ या कालखंडातील वाढ आणि विकास कशापध्दतीने झाला आहे हे निवडक दर्शकांवरून समजून येते आणि संस्थेच्या विकासाचे चित्र आपल्यासमोर येते. यासाठीच पुढील निवडक दर्शक चर्चेसाठी घेतले आहेत.

| | |
|---|---|
| १) सभासदसंख्या | ७) वसुली |
| २) भागभांडवल | ८) थकबाकी |
| ३) ठेवी | ९) बँक कर्ज |
| ४) कर्जपुरवठा | १०) गुंतवणूक |
| ५) खेळते भांडवल | ११) नफा |
| ६) राखीव आणि इतर निधी | १२) ऑडीट वर्ग |

या निवडक दर्शकांचे १९७१ ते १९८६ या काळाचा संदर्भ घेऊन खालील विश्लेषण केले आहे. १९७० पासून पुढील काळामध्ये संस्थेचे विविध विभाग स्थापन केले. कर्जपुरवठयामध्येही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. संस्थेची सध्याची प्रगती ही प्रामुख्याने १९७० नंतरचे काळामध्येच झाली असल्याचे सर्वसाधारणपणे दिसून येते. यासाठीच संस्थेच्या विकासाच्या व वाढीच्या अभ्यासासाठी आणि विश्लेषणासाठी १९७१ ते १९८६ हा काळ निवडलेला आहे. या काळातील वरील दर्शकांची पाहणी केली असता झालेला विकासात्मक बदल लगेच ध्यानात येतो.

## १) सभासदसंख्या:

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सभासदसंख्येमध्ये प्रतिवर्षी वाढ झालेली आहे. १९७०-७१ साली सभासदसंख्या १०४५ इतकी होती ती नंतरचे काळामध्ये सतत वाढलेली आहे. १९७२-७३ या वर्षी १०८१ इतकी संख्या झाली आणि १९७४-७५ यावर्षी सभासदसंख्या ११८५ इतकी आहे म्हणजे

तुलता क्रमांक ३.१

:- अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या वाढीचे कांही निवडक दर्शक -:

| वर्ष | सभासदसंख्या | भागभांडवल रु. | ठेवी रु | कर्जपुरवठा रु. | खेळते भांडवल रु. | राखीव व इतर निधी | वसूली रु. | थकबाकी रु | बँककर्ज देणे रु. | गुंतवणूक रु. | नफा रु. | ऑडिट वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७०-७१ | १०४३ | १११८६७५ | २२९६९६ | २२८२४७९ | ३६९३७२२ | २४६३८२ | २२६११३९ | २१३४० | १९४३०९९ | ३२४८७६ | ८८७१६ | अ |
| १९७१-७२ | १०६४ | १२७८१८५ | ४९२०९४ | २९५६६१८ | ४४६५५२३ | ३००४१६ | २६७४४४० | २८२१७८ | २२६०२८२ | ४४१९५५ | ७७५३५ | अ |
| १९७२-७३ | १०८१ | १४०९८१५ | ११९६९१० | ३१७८८५१ | ६१४१२७८ | ३२९२७६ | ३११३४९२ | ६५३५९ | २३११६४४ | ४५४५२५ | ९४७०३ | अ |
| १९७३-७४ | ११२१ | १५४३१३५ | ११३६७७५ | ३०७७५३२ | ५५५००९१ | ३२१४३२ | २८३५१७४ | २४२३५८ | २४१००३२ | ४७७८३४ | ९४१५८ | अ |
| १९७४-७५ | ११८५ | १७४१०४० | १४४०२६१ | ३६७७८३४ | ६६२१८७९ | ३५७४३६ | ३३५१६२९ | ३२६२०५ | २८०८९८६ | ४५११७६ | १८५०८९ | अ |
| १९७५-७६ | १२०५ | १८३३३७५ | १३६७४८९ | २१८६१८४ | ४७१०९०५ | ४४६१२९ | १६१७८५८ | ५६८३२६ | ७४६७२९ | ५५२८५९ | २०५८३० | अ |
| १९७६-७७ | १२६८ | १७९७२८० | ३६७६१२ | २६७३२०५ | ५१९२५६५ | ५५१७४१ | २२६४७०५ | ४०८५०० | १९३३५५० | ६८४३६६ | १०३०९१ | अ |
| १९७७-७८ | १३६१ | १८७६७१५ | २३३१३२ | ३५२४९२५ | ५४६५७४८ | ५६६८८३ | ३१९१५२५ | ३३३४०० | २४३१०१५ | ७३२०७६ | १८२११५ | अ |
| १९७८-७९ | १३७५ | १९६८०४० | ४५८८५८ | ३२२००४० | ५५३४१५४ | ६८७३७५ | २९३६७८० | ३१५२६० | २०५११२५ | ८५५३३७ | १६४३६२ | अ |
| १९७९-८० | १३९१ | २०३२३१० | ३३००४२ | २५३०४६६ | ४९०८६०३ | ७३४३४४ | २२३१६३५ | २९८८३१ | १६१०१८८ | ९१०५४१ | १७७८२७ | अ |
| १९८०-८१ | १४१६ | २१९४३१० | ४२६७६४ | ४३००४९८ | ७०८१११६ | ८७१३९८ | २७३९८०० | १९८१३० | ३१५४८५८ | ९२१२५० | २३८००४ | अ |
| १९८१-८२ | १४५४ | २४०८३२० | ६८०२१८ | ५९२८८९३ | ९७५३७०७ | ९९२७२३ | ४५३९२०० | १७२१५० | ५२९६१७७ | ९२४२९२ | २५३३९२ | अ |
| १९८२-८३ | १५१८ | २५६७६०० | ६६००७६ | ४९९१२८३ | ९३८१७७२ | ११२४७४७ | ४८४८०० | ८०२२१८ | ३८२७६९१ | १००३२१३ | २५५८७४ | अ |
| १९८३-८४ | १५३० | २६७५०८० | ६६८२८१ | ४६९४९११ | ८५८४५४७ | १२५४०७७ | ४२६३४०० | ६५५७०० | ३४०६७७९ | १०८९०६१ | ३०२१४६ | अ |
| १९८४-८५ | १५४३ | २८००८३० | ७५६४५४ | ५१६४९९१ | १०२२४५९१ | १२५५८८६ | ४४१५४०० | ३४९३०० | ३८४६२२० | ११२६६४७ | २२८३०२ | अ |
| १९८५-८६ | १५५८ | २९२७९०० | ९०१५९० | ६६६८२२४ | १०९१७३१४ | १३७०३५७ | ५६३६३०० | १६१५०० | ५५४८०९६ | १२९११५३ | २४७९१६ | अ |
| वृध्दीदर | २.७१ टक्के | ६.६२ टक्के | ९.५४ टक्के | ७.४० टक्के | ७.४९ टक्के | १२.११ टक्के | ६.२७ टक्के | १४.४४ टक्के | ७.२४ टक्के | ९.६३ टक्के | ७.०९ टक्के | - |

म्हणजे दोन वर्षात १०४ इतके सभासद वाढले आहेत (तक्ता क्रमांक ३.१). १९७४-७५ या एक वर्षाचे काळातील सभासदसंख्येतील वार्षिक वाढ ५.०४ टक्के इतकी आहे (तक्ता क्रमांक ३.२).

सभासदसंख्येमध्ये दर वर्षी सभासदत्वाचा राजीनामा आणि सभासदाचा मृत्यू यामुळे कमी होणारी संख्या अगदीच नाममात्र आहे. त्यामुळे सभासदसंख्या मागील वर्षापेक्षा कमी झाली आहे असे दिसून येत नाही. १९७७-७८ यावर्षी सभासदसंख्येमधील वार्षिक वाढ इतर वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. ही वाढ ६.८३ टक्के अशी आहे (तक्ता क्रमांक ३.२). १९७६-७७ आणि १९७७-७८ साली अनुक्रमे १२६८ आणि १३६१ इतकी सभासदसंख्या आहे.

१९८३-८४ नंतर पुढील काळातील सभासदसंख्येतील वाढ अगदीच अल्प आहे. या काळातील वार्षिक वाढीचा दर १ टक्का पेक्षाही कमी आहे. १९७०-७१ ते १९८५-८६ या एकूण काळामधील सभासदसंख्येतील वाढ १½ पट इतकी आहे. एक वैशिष्ट म्हणजे या काळात कोणत्याही वर्षी सभासदसंख्येमध्ये घट झालेली नाही. संस्थेची सभासदसंख्या १९७१ ते १९७६ या काळात २.९२ टक्के या वार्षिक दराने झाली. १९७६ ते १९८१ या काळात हा वृध्दीदर ३.२७ टक्के इतका होता, तर १९८१ ते १९८६ याकाळात हाच वृध्दीदर १.९२ टक्के इतका होता.

२) भागभांडवल:

भागभांडवल हा भेळत्या भांडवलातील एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. १९७०-७१ ते १९८५-८६ या एकूण काळामध्ये अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे भागभांडवल सतत दरवर्षी वाढत आहे असे दिसून येते. या काळातील भागभांडवल हे फक्त सभासदांचेच आहे. सरकारी भागभांडवल संस्थेने स्वीकारलेले नाही. या काळातील भागभांडवलातील एकूण वाढ सुमारे २½ पट अशी आहे.

१९७०-७१ साली रु.१११८६७५ इतके भागभांडवल होते ते वाढून १९८५-८६ साली रु.२९२७९०० इतके झाले आहे (तक्ता क्रमांक ३.१).भागभांडवलात सर्वच वर्षात वाढ दिसून येते. मात्र १९७६-७७ यावर्षी भागभांडवलात वाढ न होता मागील वर्षापेक्षा घट झालेली आहे. ती - १.४३ टक्के इतकी आहे (तक्ता क्रमांक ३.२). १९७६-७७ यावर्षी रु.१७९७२८० इतके भागभांडवल होते. १९७५-७६ यावर्षी ते रु.१८२३३७५ इतके होते (तक्ता क्रमांक ३.१). फक्त १९७६-७७ याच वर्षी भागभांडवल कमी राहण्याची कारणे पुढीलप्रमाणे:-

१) संस्थेचे मयत सभासद व राजीनामा दिलेले सभासद यांचे भागभांडवल परत केले.

२) ऊस पथदर्शक योजनेमध्ये भाग घेतलेल्या सभासदांचे ऊस पथदर्शक योजनेच्या कर्जवाटप धोरणाप्रमाणे कर्जामधून शेकडा १० टक्के प्रमाणे भागभांडवल कपात न करता कर्जवाटप करण्यात आले.

३) ज्या सभासदांचे भागभांडवल रु.५००० पेक्षा जास्त वसूल झाले आहे अशा सभासदांची कपात रक्कम याचवर्षी संस्थेने त्यांचे नांवे बचत ठेव खात्यामध्ये जमा केली.

१९७१-७२ यावर्षी भागभांडवलातील वार्षिक वाढ १२.४८ टक्के इतकी आहे. ही वाढ इतर सर्व वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक आहे (तक्ता क्रमांक ३.२). १९७१ ते १९८६ या काळातील भागभांडवलाचा वृध्दीदर ६.६२ टक्के इतका आहे.

३) <u>ठेवी:</u>

संस्थेने बाहेरून उभारलेल्या निधीमधील ( Borrowed Funds ) ठेवी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. कारण कर्ज उभारणीपेक्षा ठेवीरूपाने जमा केलेल्या भांडवलावर व्याज कमी खर्च होते. अशा भांडवलाचा वापर

संस्थेच्या निर्णयानुसार, गरजेनुसार करता येतो. अंकलखोप विविध कार्यकारी संस्थेने ठेवी मिळण्यावर चांगला भर ठेवलेला दिसून येतो. १९७१ ते १९८६ या एकूण काळामध्ये संस्थेकडे असणाऱ्या एकूण ठेवीमध्ये सतत वाढ झाली आहे. या काळातील ठेवीचा वृध्दीदर ९.५४ टक्के आहे. १९७०-७१ ते १९७४-७५ या काळात ठेवीत सर्वाधिक वाढ आहे. १९७०-७१ मध्ये रू.२२९६९६ इतकी ठेव होती. तीच रक्कम १९७४-७५ पर्यंत रू.१४४०२६१ इतकी वाढली. ही वाढ जवळजवळ ७ पट आहे (तक्ता क्रमांक ३.१). या काळामध्ये ठेवीची रक्कम जास्त असण्याचे प्रमुख कारण म्हणजे संस्था सभासदांचे ऊसबिलातून कांही रक्कम ठेवरूपाने घेत होती. १९७६-७७ पासून संस्थेने असे धोरण बदलल्यामुळे पुढील काळामध्ये ठेवीमधील वाढ मंदगतीने झाल्याचे दिसून येते.

१९७०-७१ ते १९७५-८६ या काळामध्ये ठेवीचा वार्षिक वृध्दीदर ४२.८७ टक्के इतका होता. १९७६-ते १९८१ या काळामध्ये हा दर २०.७७ टक्के झाला तर १९८१ ते १९८६ या काळात हा वृध्दीदर १६.१३ टक्के होता. १९७१ ते १९८६ या एकूण अभ्यास काळात ठेवीमधील वार्षिक वाढ १९७२-७३ यावर्षी सर्वाधिक आहे. यावर्षी मागील वर्षापेक्षा ७४.३३ टक्के वाढ आहे. याउलट ठेवीचा वार्षिक वाढीचा दर १९८३-८४ यावर्षी इतर सर्व वर्षांच्या तुलनेत सर्वात कमी आहे. हा दर १.२३ टक्के असा होता. (तक्ता क्रमांक ३.२). १९८५-८६ यावर्षी रू.९०१५९० इतकी ठेव होती.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या एकूण ठेवीमध्ये बचत ठेव, कायम ठेव, मुदतठेव, इत्यादि प्रकारच्या ठेवींचा समावेश आहे.

४) <u>कर्जपुरवठा:</u>

एकूण कर्जपरवठयामध्ये अल्पमुदती व मध्यममुदती कर्जपुरवठयाचा समावेश होतो. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली, शाखा अंकलखोप

या बँकेतून घेतलेली कर्जे आणि स्वत:कडील भांडवल यामधून अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था आपल्या सभासदांना कर्जपुरवठा करते. १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये संस्थेने सभासदांना पुरविलेल्या एकूण कर्ज रकमेमध्ये सुमारे तीन पटीनेवाढ झालेली आहे. १९७०-७१ मध्ये रु.२२८२४७९ इतका कर्जपुरवठा होता तर १९८५-८६ यावर्षी रु.६६६८२२४ इतका कर्जपुरवठा केला आहे (तक्ता क्रमांक ३.१). ही वाढ ७.४० टक्के इतक्या वार्षिक वृध्दीदराची आहे.

१९७१ ते १९८६ या काळामधील संस्थेच्या कर्जपुरवठयातील बदल हा चढउताराच्या स्वरूपाचा आहे. कारण कर्जपुरवठयामधील वाढ सतत प्रतिवर्षी होत राहीली नाही. १९७१ ते १९७६ या काळामध्ये कर्जपुरवठयाचा वार्षिक वृध्दीदर ०.८५ टक्के आहे. कांही वर्षात मागील वर्षापेक्षा कमी कर्जपुरवठा झाला आहे. उदा.१९७४-७५ यावर्षी रु.३६७७७८३४ इतका कर्जपुरवठा होता. तो १९७५-७६ यावर्षी रु.२१८६१८४ इतका झाला आहे (तक्ता क्रमांक ३.१). कर्जमागणी कमी राहिल्याने याच वर्षी कर्जपुरवठयामध्ये ४०,५६ टक्के इतकी घट झाली. १९७६ ते १९८१ या काळात कर्जपुरवठयाचा वार्षिक वृध्दीदर १४.४८ टक्के होता तोच १९८१ ते १९८६ या काळात ९.१६ टक्के असा झाला आहे. १९८५-८६ यावर्षी कर्जपुरवठयाच्या वार्षिक वाढीचा दर २९.१० टक्के इतका आहे. १९७१ ते १९८६ या संपूर्ण काळातील इतर वर्षांच्या तुलनेत तो सर्वाधिक आहे (तक्ता क्रमांक ३.२).

५) <u>खेळते भांडवल:</u>

१९७०-७१ ते १९८५-८६ या संपूर्ण काळाचा विचार करता अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे खेळते भांडवल या काळात सुमारे तीन पटीने वाढले आहे. मात्र ही वाढ सलग न राहता चढउताराची आहे. १९७०-७१ साली संस्थेचे खेळते भांडवल रु.३६९३७२२ इतके होते ते १९८५-८६ साली

रु.१०९९७३१४ इतके झाले आहे (तक्ता क्रमांक ३.१). या एकूण काळातील खेळत्या मांडवलाचा वार्षिक वृध्दीदर ७.४९ टक्के इतका आहे. १९८३-८४ ते १९८५-८६ या काळामध्ये खेळत्या मांडवलातील वाढ जास्त झालेली दिसून येते. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे खेळते मांडवल प्रामुख्याने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून मिळणा-या कर्जरकमेवरच अवलंबून आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्जधारणातील बदलाचा परिणाम संस्थेच्या खेळत्या मांडवलावरती झालेला आहे.

१९७१ ते १९८६ या काळात खेळत्या मांडवलाच्या वार्षिक वाढीचा दर सतत बदलता असा आहे. १९८० ते १९८१ यावर्षी हा दर इतर वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक म्हणजे अधिक ३०.६८ टक्के इतका होता तर १९७८-७९ यावर्षी खेळत्या मांडवलाच्या वार्षिक वाढीचा दर फक्त अधिक १.२४ टक्के इतकाच होता (तक्ता क्रमांक ३.२). १९७१ ते १९७६ या काळातील वार्षिक वृध्दीदर ४.९८ टक्के होता. १९७५-७६ यावर्षी १९७४-७५ पेक्षा खेळते मांडवल बरेच कमी झाले असल्याचे दिसून येते. ते रु.६६२१८७९ वरून रु.४७१०९०५ इतके कमी झाले. १९७५-७६ यावर्षी २८.८६ टक्के एवढया दराने खेळते मांडवल घटले.

१९७६ ते १९८१ या काळात खेळत्या मांडवलात वार्षिक ८.४९ टक्के या दराने वाढ झाली होती. तर १९८१ ते १९८६ या काळात वार्षिक वृध्दीदर ९.०४ टक्के इतका होता. अशात-हेने अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या खेळत्या मांडवलात बदल झाले असले तरी एकूण खेळत्या मांडवलातील वाढ लक्षणीय अशी आहे.

६) <u>राखीव आणि इतर निधी:</u>

राखीव निधी आणि भागभांडवल मिळून सहकारी पतसंस्थांचा स्वत:चे मालकीचा निधी निर्माण झालेला असतो. यामध्ये राखीव निधी हा अत्यंत

महत्वाचा घटक आहे. त्याचे कारण म्हणजे राखीव निधी कोणत्याही परिस्थितीत संस्थेकडेच राहतो. सभासदत्वाच्या राजीनाम्यानंतर सभासद आपले भागभांडवल संस्थेमधून काढून घेऊ शकतो परंतु राखीव निधीबाबत सभासदास कांही करता येत नाही. सहकारी पतसंस्थांचा असा राखीव निधी सर्वसाधारणपणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये ठेवला जातो. सहकारी पतसंस्था स्वत:चे नफ्यातील कांही ठराविक भाग दरवर्षी बाजूला काढून राखीव निधीची उभारणी करीत असते. त्याचे प्रमाण सहकारी कायद्याप्रमाणे नफ्याच्या २५ टक्के इतके सर्वसाधारणपणे असते. या राखीव निधीचा वापर संस्था आर्थिकदृष्ट्या संकटात असता केला जातो.

१९७१ ते १९८६ या काळामध्ये अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेकडील राखीव आणि इतर निधीमध्ये सतत वाढ झालेली आहे. ही वाढ वार्षिक १२.११ टक्के अशा दराने झाली आहे. प्रतिवर्षी राखीव व इतर निधीमधील रक्कम वाढलेली आहे. १९७१ ते १९८६ या संपूर्ण काळात राखीव व इतर निधी यामध्ये सुमारे पाच पटीने वाढ झाली आहे. एकूण निधी रक्कम १९७०-७१ मध्ये रू.२४६३८२ इतकी होती तीच १९८५-८६ पर्यंत रू.१३७०३५७ इतकी वाढली आहे (तक्ता क्रमांक ३.१). १९७७-७८ नंतरचे काळात राखीव व इतर निधीच्या वार्षिक वाढीचा दर जास्त आहे (तक्ता क्रमांक ३.२). १९७१ ते १९७६ या काळात एकूण निधीमध्ये वाढ वार्षिक १२.६० टक्के दराने झाली. १९७६ ते १९८१ या काळातील वार्षिक वृध्दीदर १४.३२ टक्के होता आणि १९८१ ते १९८६ या काळामध्ये राखीव आणि इतर निधीमधील वार्षिक वृध्दीदर ९.४७ टक्के होता.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेमध्ये राखीव निधीबरोबरच स्पेशल बँडेट निधी, इमारत निधी, बुडीत व संशयास्पद निधी, नफा समानीकरण निधी, इमारत घसारा निधी असे विविध निधीही उभारण्यात

आले आहेत. मात्र या सर्व निधीमध्ये राखीव निधी हाच अत्यंत महत्वाचा घटक आहे. १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या राखीव आणि इतर निधीमध्ये उल्लेखनिय अशी वाढ झालेली आहे.

७) वसुली :

सहकारी पतसंस्थांचे कार्यामध्ये कर्ज वसूलीस महत्वाचे स्थान आहे. पूर्वी दिलेल्या कर्जाची वसूली योग्य व वेळेवर होत असेल तरच नवीन कर्ज देण्यामध्ये अडचणी येत नाहीत. कर्ज वसूली योग्य होण्यासाठी संस्थेने कर्ज रकमेच्या वापरावर नियंत्रण व देखरेख ठेवणे आवश्यक असते. अन्यथा अनुत्पादक कार्यासाठी कर्ज रकमेचा वापर झाल्यास कर्ज वसूली योग्य प्रमाणात होत नाही.

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेची वसूली अत्यंत चांगल्या प्रकारे असल्याने थकबाकी कमी आहे. संस्थेने सभासदांना दिलेल्या कर्जाची सुमारे ९० टक्के वसूली ही विपणन संबंध पध्दतीने होते. १९७०-७१ ते १९८५-८६ या संपूर्ण काळामध्ये संस्थेची कर्जवसूली प्रतिवर्षी वाढत्या प्रमाणात आहे (तक्ता क्रमांक ३.३). १९७१ मध्ये वसूली रू.२२६११३९ इतकी होती. तीच १९८६ मध्ये रू.५३३६३०० इतकी झालेली आहे. १९७१ ते १९८६ या काळातील ही वसूलीमधील वाढ सुमारे २$\frac{1}{2}$ पट इतकी आहे. सदरचे काळातील वसूलीतील वार्षिक वृध्दीदर ६.२७ टक्के इतका आहे. वसूलीमधील बदल चढउताराच्या स्वरूपाचा आहे. १९७५-७६ यावर्षी इतर वर्षाच्या तुलनेत वसूली फार कमी आहे. या वर्षी रू.१३१७८५८ इतकी वसूली आहे (तक्ता क्रमांक ३.१). १९८०-८१ यावर्षी वसूलीच्या वार्षिक वाढीचा दर सर्वाधिक आहे, म्हणजे मागील वर्षापेक्षा ४५.०६ टक्के इतकी जास्त वसूली आहे (तक्ता क्रमांक ३.२).

तक्ता क्रमांक ३.४

## -: १९७१ ते १९८६ या काळातील निवडक दर्शकांचा वार्षिक वृध्दीदर :-

(आकडे शेकडा प्रमाणात)

| वर्ष | सभासदसंख्या | भागभांडवल | ठेवी | कर्जपुरवठा | खेळते भांडवल | राखीव व इतर निधी | वसूली | थकबाकी | बँककर्ज देणे | गुंतवणूक | नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७०-७१ | + २.६८ | + ७.९९ | + ४०.२८ | - १६.३२ | - १२.५६ | - | - १२.४१ | + ३१.५० | - २७.०३ | + २९.०१ | - ६२.३९ |
| १९७१-७२ | + १.९७ | + १२.४८ | + ५३.३३ | + २२.०८ | + १७.२८ | + १७.९९ | + १५.४५ | + २४.३६ | + १४.०३ | + ३६.०७ | - १४.४२ |
| १९७२-७३ | + १.५२ | + ९.३४ | + ७४.३३ | + ६.९९ | + २७.२९ | + ८.७६ | + १४.०१ | - ७६.८४ | + २.२२ | + २.८४ | + २२.१४ |
| १९७३-७४ | + ३.५५ | + ८.६४ | - ४०.०७ | - ३.११ | - ९.६२ | - २.२८ | - ८.९४ | + ७३.०३ | + ४.०८ | + ५.१२ | - ०.५७ |
| १९७४-७५ | + ५.०४ | + ११.३७ | + २१.०७ | + १६.३२ | + १६.१८ | + १०.०७ | + १५.४१ | + २५.७० | + १४.२१ | - ५.९२ | + १६.५७ |
| १९७५-७६ | + १.६२ | + ४.५२ | - ५.०५ | - ४०.५६ | - २८.८६ | + ११.८८ | - ५१.७३ | + ४२.६० | - ७३.४२ | + २२.३२ | + ११.२० |
| १९७६-७७ | + ४.९६ | - १.४३ | - ७३.४४ | + १८.०७ | + ९.२८ | + ११.१४ | + २८.५६ | - २८.१२ | + ६१.३८ | + २३.७८ | - ११.६५ |
| १९७७-७८ | + ६.८३ | + ४.२३ | - २८.४२ | + २४.१६ | + ५.० | + २.६७ | + २९.०४ | - १८.३८ | + २०.४६ | + ६.१७ | + ७६.६५ |
| १९७८-७९ | + १.० | + ४.६४ | + ४२.६६ | - ७.७४ | + १.२४ | + १७.५३ | - ७.९९ | - ५.४४ | - १५.६३ | + १६.८३ | - १०.८० |
| १९७९-८० | + १.१५ | + ३.१६ | - २८.०७ | - २२.११ | - ११.०३ | + ६.०४ | - २४.०१ | - ५.२१ | - २१.०५ | + ६.४५ | + ८.११ |
| १९८०-८१ | + १.७६ | + ७.३८ | + २२.६६ | + ४१.१६ | + ३०.६८ | + १५.७३ | + ४५.०६ | - ३३.७० | + ४८.१६ | + १.१७ | + ३३.८४ |
| १९८१-८२ | + २.५५ | + ८.८१ | + ३७.२६ | + २७.४७ | + २७.०४ | + १२.२२ | + १७.२४ | - १३.११ | + ४०.४३ | + ०.३३ | + ६.४६ |
| १९८२-८३ | + ४.२ | + ६.०३ | - २.१६ | - १९.८१ | - ३.८१ | + ११.७४ | - १५.४१ | + ७८.५४ | - २७.७३ | + ८.५३ | + ०.१७ |
| १९८३-८४ | + ०.७७ | + ४.०२ | + १.२३ | - ६.०१ | - ८.०५ | + १०.३१ | - १.७४ | - १८.३६ | - ११.० | + ८.५५ | + १८.०८ |
| १९८४-८५ | + ०.८५ | + ४.४१ | + ११.६६ | + १.०१ | + १६.०४ | + ०.१५ | + ३.४४ | - ४६.७२ | + ११.४२ | + ३.४५ | - ३२.३४ |
| १९८५-८६ | + ०.११ | + ४.५३ | + ११.१८ | + २१.१० | + ६.७७ | + १.११ | + २७.६५ | - ४६.२३ | + ४४.२४ | + १४.६० | + ८.५१ |

तक्ता क्रमांक ३.३

-: अल्प व मध्यममुदती कर्जाची वसूली (१९८१-८६ :-

(आकडे हजारात)

| वर्ष | एकूण वसूली रू. | अल्पमुदती कर्जवसूली रू. | मध्यममुदती कर्जवसूली रू. | कॉलम ३ चे कॉलम २ शी शेकडा प्रमाण | कॉलम ४ चे कॉलम २ शी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १९८०-८१ | २७२९.२ | २४३५.७ | २९४.१ | ८९.२३ टक्के | १०.७७ टक्के |
| १९८१-८२ | ४५३९.२ | ४२०३.२ | ३३५.५ | ९२.६१ टक्के | ७.३९ टक्के |
| १९८२-८३ | ४८४८.१ | ४५४८.३ | २९९.८ | ९३.९२ टक्के | ६.१८ टक्के |
| १९८३-८४ | ४२६३.४ | ३९९२.६ | २७०.८ | ९३.६५ टक्के | ६.३५ टक्के |
| १९८४-८५ | ४४१५.४ | ४१५९.३ | २५६.१ | ९४.२० टक्के | ५.८० टक्के |
| १९८५-८६ | ५६३६.३ | ४९६९.८ | ६६६.५ | ८८.१७ टक्के | ११.८३ टक्के |

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेची कर्जवसूली साखर कारखान्याच्या ऊसबिलावर आणि ऊसाचे दरावरही अवलंबून आहे. त्यामुळे वसूलीचे प्रमाणही कमी जास्त झाल्याचे दिसून येते. १९७१ ते १९८६ या काळामध्ये द्राक्षाबागांसाठी मध्यममुदतीचे कर्जही संस्थेने बरेचसे दिलेले आहे. कांही नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्षाबागांचे कांही वेळा नुकसान झाल्यामुळे कांही वर्षी कर्ज वसूली कमी राहीलेली आहे.

८) थकबाकी:

थकबाकीची रक्कम कमीतकमी असणे हे संस्थेच्या आरोग्याच्या व वाढत्या यशाच्यादृष्टीने आणि समासदांच्या कल्याणासाठी आवश्यक असते. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या थकबाकीचे प्रमाण १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये दिलेल्या कर्जरकमेच्या तुलनेने फारच कमी आहे.

१९७२ ते १९७६ या संपूर्ण काळामध्ये संस्थेची थकबाकी दरवर्षी वाढत आलेली आहे. १९७१-७२ साली रु.२८२१७८ इतकी थकबाकी होती ती १९७५-७६ साली रु.५६८३२६ पर्यंत वाढली आहे (तक्ता क्रमांक ३.१). याच काळात थकबाकीचा वार्षिक वृध्दीदर २४.३६ टक्के वरून ४२.६० टक्के इतका वाढला आहे (तक्ता क्रमांक ३.२). १९७५-७६ ते १९८१-८२ या काळामध्ये थकबाकीचे प्रमाण प्रतिवर्षी घटत आले आहे. १९७५-७६ मध्ये रु.५६८३२६ इतकी थकबाकी होती. त्याचे प्रमाण कमी होऊन १९८१-८२ साली रु.१७२१५० इतके झाले आहे (तक्ता क्रमांक ३.१). १९७१ ते १९७६ या काळात थकबाकीचा वार्षिक वृध्दीदर १२.७८ टक्के इतका आहे. तर १९७६ ते १९८१ या काळात हाच वृध्दीदर - १९ टक्के असा आणि १९८१ ते १९८६ या पुढील काळात - ६ टक्के वृध्दीदर राहीला. १९७१ ते १९८६ या संपूर्ण काळात थकबाकीतील वाढ १४.४४ टक्के या दराने झाली आहे (तक्ता क्रमांक ३.१).

थकबाकीचे कर्जवसुलीशी प्रमाण १९७६-७७ ला १६.०२ टक्के होते. ते दरवर्षी कमी होऊन १९८१-८२ ला ३.७९ टक्के इतके झाले आहे. पुन्हा १९८३ साली हेच प्रमाण वाढले (१६.५४ टक्के) आणि नंतर प्रतिवर्षी कमी झाले आहे. (तक्ता क्रमांक ३.४). १९८२-८३ या वर्षी थकबाकी इतर सर्व वर्षांच्या तुलनेत जास्त आहे (रु.८०२११८). याचवर्षी थकबाकीचा

तक्ता क्रमांक ३.४

-: थकबाकीचे कर्जवसूलीशी शेकडा प्रमाण (१९७६-८६ )

(आकडे हजारात)

| वर्ष | थकबाकी | कर्जवसूली | थकबाकीचे कर्जवसूलीशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९७५-७६ | ५६८.३ | ३९५७.१ | १४.३६ टक्के |
| १९७६-७७ | ४०८.५ | २५४९.४ | १६.०२ टक्के |
| १९७७-७८ | ३३३.४ | २६४१.७ | १२.६२ टक्के |
| १९७८-७९ | ३१५.२ | ३२१५.० | ९.८० टक्के |
| १९७९-८० | २९८.८ | ४०२८.५ | ७.४१ टक्के |
| १९८०-८१ | १९८.१ | २७२९.२ | ७.२५ टक्के |
| १९८१-८२ | १७२.१ | ४५३९.२ | ३.७९ टक्के |
| १९८२-८३ | ८०२.२ | ४८४८.१ | १६.५४ टक्के |
| १९८३-८४ | ६५५.७ | ४२६३.४ | १५.३७ टक्के |
| १९८४-८५ | ३४९.३ | ४४१५.४ | ७.९१ टक्के |
| १९८५-८६ | १६१.५ | ५६३६.३ | २.८६ टक्के |

वार्षिक वृध्दीदर अधिक ७८.५४ इतका आहे (तक्ता क्रमांक ३.२). १९८२-८३ नंतर थकबाकीमध्ये वाढ न होता घट झाल्याचे दिसून येते. १९८५-८६ यावर्षी थकबाकीचे कर्जवसूलीशी प्रमाण फक्त २.८६ टक्के इतकेच आहे (तक्ता क्रमांक ३.४).

साखर कारखान्याकडून ऊसाला मिळणारा कमी दर, नैसर्गिक आपत्तीमुळे पीकांचे व बागांचे होणारे नुकसान, सभासदांकडून कर्जरकमेचा दुरूपयोग इत्यादि कारणामुळे थकबाकीमध्ये कांही ठराविक वर्षामध्ये जास्त वाढ झाल्याचे दिसून येते. याउलट साखर कारखान्याकडून ऊसबिलामधून लिकींग पध्दतीने होणारी कर्जवसूली यामुळे अनेक वर्षात थकबाकीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते.

१) <u>बँक कर्ज ( न फेडलेले ):</u>

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था ही सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,सांगली शाखा अंकलखोप यांचेकडून अल्प व मध्यम मुदतीची कर्जे घेते. आणि त्याचे सभासदांना वाटप करते. सभासदांनी कर्जमागणी वाढल्यास बँकेकडून घेतल्या जाणा-या कर्जामध्ये वाढ होते, म्हणजे संस्थेचे हे बहुतांशी सभासदांच्या कर्जमागणीवरच अवलंबून असते.

१९७०-७१ ते १९८५-८६ या संपूर्ण काळामध्ये प्रतिवर्षी अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे बँक कर्ज वाढलेले आहे. सदर काळात रू.१९४३०९९ पासून रू.५५४८०९६ पर्यंत संस्थेचे बँक कर्ज वाढले आहे. या काळात बँक कर्जाचा वार्षिक वृध्दीदर ७.२४ टक्के इतका आहे (तक्ता क्रमांक ३.१). १९७०-७१ ते १९८५-८६ या एकूण काळात सुमारे $2\frac{1}{2}$ पटीने बँक कर्जात (न फेडलेले) वाढ झाली आहे. १९७१ ते १९७६ या काळातील बँक कर्जाचा

वृध्दीदर - १७.४० टक्के असा आहे. या काळात अनुक्रमे रू.११४३०९९ आणि रू.७४६७२९ बँक कर्ज होते. १९७५-७६ मध्ये रू.७४६७२९ असणारे हे बँक कर्ज इतर सर्व वर्षातील बँक कर्जापेक्षा कमी होते. हे १९७४-७५ वर्षातील बँक कर्जापेक्षा - ७३.४२ टक्के इतके कमी आहे ( तक्ता क्रमांक ३.१ आणि ३.२).

१९७६ ते १९८१ या काळात ३३.४० टक्के या वार्षिक दराने बँक कर्जात वाढ झालेली होती आणि १९८१ ते १९८६ या काळात हा वृध्दीदर ११.९५ टक्के इतका होता. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या समासदांनी वाढ आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेने कर्जाक्रमेच्या मर्यादा वाढविल्यामुळे बँक कर्जामध्ये वाढ झालेली आहे. याशिवाय संस्थेच्या इतर कार्याकरिता लागणारे कॅश क्रेडिट सुध्दा बँकेकडून संस्था घेते. अशा कारणानी अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या बँक कर्जामध्ये वाढ दिसून येते.

१०) <u>गुंतवणूक:</u>

सहकारी पतसंस्थेने स्वत:च्या हितासाठी व व्यवहाराच्या वाढीच्यादृष्टीने नफ्यातून गुंतवणूक करणे आवश्यक असते. राखीव निधीशिवाय इतर निधी व अल्पबचती यामध्येही गुंतवणूक केली जाते. अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने स्वत:चे नफ्यामधून विविध प्रकारे गुंतवणूक केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने राखीव निधी, विशेष बुडीत कर्जनिधी, राष्ट्रीय बचतपत्रे यांचा समावेश आहे. याशिवाय सहकारी संस्थांचे भागखरेदी आणि नोकारांचा भविष्य निर्वाह निधी यामध्येही गुंतवणूक केली आहे.

१९७८-७९ पासून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्थेने स्वत:कडे घेतला आहे. त्यापूर्वीच्या काळात हा निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये होता. १९७१ ते १९८६ या संपूर्ण काळात वार्षिक ९,६३ टक्के

तक्ता क्रमांक ३.५

अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या गुंतवणूकीमधील वाढ (१९७७ ते १९८६)

| वर्ष | स्वतंत्र बुडीत कर्ज निधी रू. | राखीव निधी रू | सहकारी संस्था भाग गुंतवणूक रू. | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी रू. | राष्ट्रीय बचतपत्रे | एकूण गुंतवणूक रू | वाढीचा निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७६-७७ | १२३१० (१.८०) | ३१९५०० (४६.६८) | ३०९११६ (४५.१७) | - - | ४३४४० (६.३५) | ६८४३६६ (१००.००) | १००.०० |
| १९७७-७८ | १२९८० (१.७७) | ३६५५०० (४९.९३) | ३२६७६६ (४४.६४) | - - | २६८३० (३.६६) | ७३२०७६ (१००.००) | १०६.९७ |
| १९७८-७९ | १४५५५ (१.७०) | ३९५२०० (४६.२०) | ४१४१७६ (४८.४२) | ११५७५ (१.३६) | १९८३० (२.३२) | ८५५३३७ (१००.००) | १२४.९८ |
| १९७९-८० | १४५५५ (१.६०) | ४४४९०० (४८.८६) | ४१४३५४ (४५.५१) | १८९०२ (२.०७) | १७८३० (१.९६) | ९१०५४१ (१००.००) | १३३.०४ |
| १९८०-८१ | १६३४७ (१.७७) | ४४४९०० (४८.२९) | ४१४३५५ (४४.९८) | २७८१८ (३.०२) | १७८३० (१.९४) | ९२१२५० (१००.००) | १३४.६१ |
| १९८१-८२ | १७३२३ (१.८७) | ४४४९०० (४८.१३) | ४०४१४८ (४३.७३) | ४१०९१ (४.४५) | १६८३० (१.८२) | ९२४२९२ (१००.००) | १३५.०५ |
| १९८२-८३ | १८३५७ (१.८३) | ४४४९०० (४४.३५) | ४७४१४८ (४७.२६) | ५३९७८ (५.३८) | ११८३० (१.१८) | १००३२१३ (१००.००) | १४६.५१ |
| १९८३-८४ | १९४०४ (१.७८) | ५२४९०० (४८.२०) | ४७४१४८ (४३.५४) | ६१५२९ (५.६५) | ९०८० (०.८३) | १०८९०६१ (१००.००) | १५९.११ |
| १९८४-८५ | २०४६२ (१.८२) | ५२४९०० (४६.५९) | ४९९१३८ (४४.३०) | ७३०६७ (६.४९) | ९०८० (०.८०) | ११२६६४७ (१००.००) | १६४.६२ |
| १९८५-८६ | २१६८५ (१.६८) | ५२४९०० (४०.६५) | ५९२३२८ (४५.८८) | ८२८२० (६.४१) | ६९४२० (५.३८) | १२९११५३ (१००.००) | १८८.६६ |

कंसातील आंकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.

दराने संस्थेच्या गुंतवणूकीमध्ये वाढ झालेली होती. १९७१ ते १९७६ या काळात वार्षिक वृध्दीदर ११.१२ टक्के होता. १९७६ नंतरचे काळात गुंतवणूकीमध्ये विशेष वाढ झालेली आहे. राष्ट्रीय बचतपत्रांची मुदत संपल्याने अशी रक्कम संस्थेने परत घेतली आहे आणि त्यामध्ये १९८३-८४ पर्यंत नवीन गुंतवणूक केली आहे. १९८५-८६ या वर्षात रू.६०३४० इतकी गुंतवणूक राष्ट्रीय बचतपत्रामध्ये केली आहे. त्यामुळे सदर वर्षात राष्ट्रीय बचतपत्रामधील गुंतवणूक रू.६९४२० इतकी झाली.(तक्ता क्रमांक ३.५). राखीव निधी, विशेष बुडीत कर्जनिधी, सहकारी संस्था भाग खरेदी, कर्मचारी भविष्य निर्वाहनिधी या सर्व घटकांमधील गुंतवणूक प्रतिवर्षी वाढल्याचे दिसून येते.

१९७६ ते १९८१ या काळात गुंतवणूकीतील वाढ वार्षिक १०.७५ टक्के दराने झाली. तर १९८१ ते १९८६ या काळातील गुंतवणूकीच्या वाढीचा दर ६.९८ टक्के इतका होता. १९७६-७७ ते १९८५-८६ या काळामध्ये सहकारी संस्थांच्या भाग गुंतवणूकीमध्ये रू.३०९११६ पासून रू.५९२३२८ पर्यंत वाढ झाली आहे (तक्ता क्रमांक ३.५). याच काळात संस्थेची एकूण गुंतवणूक रू.६८४३६६ वरून रू.१२९११५३ पर्यंत वाढलेली आहे. ही वाढ सुमारे दुप्पटीने झाल्याचे दिसून येते (तक्ता क्रमांक ३.१). १९७५ मध्ये एकूण गुंतवणूकीत मागील वर्षापेक्षा घट झालेली आहे. गुंतवणूकीचा वार्षिक वृध्दीदर १९८१-८२ यावर्षी इतर सर्व वर्षाच्या तुलनेत सर्वात कमी म्हणजे अधिक ०.३३ टक्के इतका आहे (तक्ता क्रमांक ३.२).

११) नफा:

सहकारी संस्थेमध्ये नफा मिळविणेपेक्षा सेवा पुरविणे आणि सभासदांच्या गरजा भागविणे याकडे जास्त लक्ष पुरविले जाते. त्यामुळे कांही

| खाते | १९७५-७६ | १९७६-७७ | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | १९८५-८६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) मुख्य कार्यालय | १७८७२४<br>(७५.६१) | ११५०३८<br>(७७.०३) | १२९९०२<br>(६७.६२) | १२५४०१<br>(७०.६८) | ८३२४७<br>(४६.८२) | १००७५८<br>(४२.३३) | १००६१९<br>(३९.७१) | १३८५२२<br>(५३.९९) | १८६८२१<br>(६१.८३) | १०७८६९<br>(४२.३०) | १५१३४०<br>(५१.२५) |
| २) ग्राहक भांडार क्र.१ | ६४६७<br>(२.७४) | ७०२४<br>(४.७०) | ९४६<br>(०.४९) | २२५१<br>(१.२७) | ३५०९<br>(१.९७) | ८०१०<br>(३.३८) | ६५२६<br>(२.५८) | ३६९६<br>(१.४५) | १००६६<br>(३.३३) | १५७९७<br>(६.१९) | ४६१८<br>(१.५६) |
| ३) ग्राहक भांडार क्र.२ | ५७२४<br>(२.४२) | ६३८६<br>(४.२७) | ३९९८<br>(२.०८) | ७८८७<br>(४.४४) | ५७८८<br>(३.२६) | १०९०६<br>(४.५८) | ९९३३<br>(३.९२) | १०३६८<br>(४.०४) | १५३३७<br>(५.०८) | १६७४१<br>(६.५७) | ४०५१<br>(१.३७) |
| ४) खत विभाग | ३८७५४<br>(१६.४०) | -<br>- | ४६४३४<br>(२४.१७) | ३०५३२<br>(१७.२१) | ७३०३३<br>(४१.०६) | १०८८६७<br>(४५.७४) | १०६१८८<br>(४१.९०) | ७६०९९<br>(२९.६६) | ६६१६४<br>(२१.९०) | ९४२८६<br>(३६.९८) | १२०३७१<br>(४०.७६) |
| ५) कापड विभाग | ३१०३<br>(१.३१) | ११९२८<br>(७.९९) | १०८३३<br>(५.६३) | ११३५८<br>(६.४०) | ११२२१<br>(६.२१) | ८५१०<br>(३.५८) | १६६००<br>(६.५५) | १०३२७<br>(४.०३) | १५५२८<br>(५.१४) | ८१६१<br>(३.२०) | १०९१९<br>(३.६९) |
| ६) मांडी विभाग | - | - | - | - | - | - | ९१८३<br>(३.६२) | १००४६<br>(४.११) | २६११<br>(०.८६) | ७३२४<br>(२.८७) | - |
| ७) स्टेशनरी-कटलरी विभाग. | - | - | - | - | - | - | १९४९<br>(०.७७) | ६७८१<br>(२.६४) | ५४००<br>(१.७९) | ४८२१<br>(१.८९) | ३९७६<br>(१.३४) |
| ८) औषध विभाग | - | - | - | - | १०२९<br>(०.५८) | ९५३<br>(०.४०) | २३९४<br>(०.९५) | - | २११<br>(०.०७) | - | - |
| ९) दूध विभाग | ३५८९<br>(१.५१) | ८९६५<br>(६.०१) | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १०) टॅक्टर विभाग | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| एकूण------- | २३६३६१<br>(१००.००) | १४९३४७<br>(१००.००) | १९२११३<br>(१००.००) | १७७४२९<br>(१००.००) | १७७८२७<br>(१००.००) | २३८००४<br>(१००.००) | २५३३९२<br>(१००.००) | २५६५३९<br>(१००.००) | ३०२१४६<br>(१००.००) | २५५००२<br>(१००.००) | २९५२७६<br>(१००.००) |
| वजा तोटा | ३०५३१<br>(टॅक्टर) | १२८३८(खत)<br>३२७४७(ट्रॅक्टर)<br>६७०(औषध) | २१०४(औषध)<br>७८९४ | १३०६७(औषध) | | | | ६६५(औषध) | | २६७०० (औषध) | ६८३५ (मांडी) |
| एकूण नफा ---- | २०५८३० | १०३०९१ | १८२११५ | १६४३६२ | १७७८२७ | २३८००४ | २५३३९२ | २५५८७४ | ३०२१४६ | २२८३०२ | २४७९१६ |
| वाढीचा निर्देशांक | १००.०० | ४९.११ | ८८.४८ | ७९.८६ | ८६.४० | ११५.६३ | १२३.१० | १२४.३१ | १४६.७९ | ११० ११ | १२० ४४ |

तक्ता क्रमांक ३.६

अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या खरेदी-विक्री व्यवहारातील नफा-तोटा (निव्वळ नफा)

(१९७६ ते १९८६)

(कंसातील आकडे एकुण नफ्याशी शेकडा प्रमाण दर्शवितात)

विभाग सभासदांच्या सोयीसाठी ना नफा ना तोटा यादृष्टीने चालविले जातात. अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने सभासदांना आणि इतर लोकांना आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणेसाठी आणि सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक विभाग निर्माण केलेले आहेत. त्यामधून संस्थेला कांही प्रमाणात नफा मिळतो. १९७०-७१ ते १९८५-८६ या काळामध्ये संस्थेच्या नफ्यामध्ये वार्षिक ७.०९ टक्के दराने वाढ झाली आहे. सदर काळात संस्थचा निव्वळ नफा सुमारे तीन पटीने वाढला आहे. यावरून संस्थेच्या एकूण व्यवहारामध्ये तसेच कार्यक्षेत्रात वाढ झाल्याचे सिध्द होते.

१९७०-७१ साली अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेचा निव्वळ नफा रू.८८७१६ इतका होता तो १९८०-८१ साली रू.२३८००४ इतका झाला, आणि १९८५-८६ यावर्षी संस्थेला रू.२४७९१६ इतका निव्वळ नफा य उरला आहे (तक्ता क्रमांक ३.१). नफ्यामधील वार्षिक वाढीचा दर चढउताराच्या स्वरूपाचा आहे. १९७९-८० नंतरचे काळात प्रतिवर्षी नफ्याचा वार्षिक वृध्दीदर जास्त आहे असे दिसून येते. १९७३-७४ यावर्षी नफा वाढीचा दर - ०.५७ टक्के होता तर १९७४-७५ या वर्षाचा नफ्याचा वार्षिक वृध्दीदर अधिक ९६.५७ टक्के असा होता (तक्ता क्रमांक ३.२).

१९७१ ते १९७६ या काळात नफ्याचा वार्षिक वृध्दीदर १८.३३ टक्के होता तोच १९७६ ते १९८१ या काळात २.९४ असा होता आणि १९८१ ते १९८६ या काळात हा वृध्दीदर ०.८१ टक्के असा होता. यावरून संस्थेच्या नफ्याच्या वाढीची गती कमी होते आहे असे निदर्शनास येते.

अंक्लखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे कर्जपुरवठा विभाग आहे. याशिवाय ग्राहक भांडार क्रमांक १ व २ आणि खतविभाग, कापड विभाग, भांडी, स्टेशनरी-कटलरी, औषध विभाग,

दूध विभाग, ट्रॅक्टर विभाग असे स्वतंत्र विभाग आहेत. संस्थेला मिळणाऱ्या एकूण निव्वळ नफ्यापैकी सरासरी ५० टक्के निव्वळ नफा मुख्य कार्यालयाच्या म्हणजे कर्जपुरवठा विभागाचा आहे (तक्ता क्रमांक ३.६). १९७०-७१ पासून सतत तोटा आल्यामुळे १९७६-७७ नंतर ट्रॅक्टर विभाग संस्थेने बंद केला आहे. दूध उत्पादनास चालना देण्यासाठी स्वतंत्र दूध संस्था स्थापन करण्याच्या सरकारच्या धोरणानुसार संस्थेने दूध विभागही १९७६-७७ नंतर बंद केला आहे.

संस्थेच्या खत विभागाला मात्र रासायनिक खते व इतर वस्तूंची विक्री सतत वाढत गेल्याने प्रतिवर्षी नफा होत असल्याचे दिसून येते. हा नफा संस्थेच्या एकूण नफ्याच्या सरासरी ३० टक्के इतका आहे (तक्ता क्रमांक ३.६). याबरोबरच कापड विभागालाही अनेक वर्षी निव्वळ नफा झाला नाही. औषध विभागाकडे नफा फारसा नसला तरीही सभासदांच्या आणि गावातील व परिसरातील इतर नागरिकांच्या सोयीसाठी संस्थेने सदर विभाग चालूच ठेवला आहे.

१२) <u>ऑडीट वर्ग:</u>

सहकारी खात्यातील ऑडिटरने सहकारी संस्थेचे ऑडिट पूर्ण केल्यावर त्या ऑडिटरला ऑडिट केलेल्या सहकारी संस्थेला 'ऑडिट तपासणी वर्ग ' द्यावा लागतो. हे सहकारी कायद्याने सक्तीचे केले आहे. सहकारी संस्थेचा ऑडिट वर्ग सहकारी संस्थेचा दर्जा कशा प्रकारचा आहे हे स्पष्ट करण्यास मदत करतो. ऑडिट वर्गावरच संस्थेला मिळणारी मदत आणि सवलती अवलंबून असतात. बँका कर्ज देताना ऑडिट वर्ग विचारात घेतात. यादृष्टीने ऑडिट वर्ग महत्वाचा आहे. ' अ ', 'ब ', ' क ', ' ड ' असा ऑडिट वर्ग दिला जातो. यापैकी ' अ ' वर्ग मिळालेली संस्था म्हणजे

आदर्श सहकारी संस्था असते. आर्थिक परिस्थिती, ठेवी, मांडवलवाढ, कर्जफेड यादृष्टीने संस्था यशस्वी के असते. थकबाकीचे प्रमाण अत्यल्प असते. कायद्यानुसार हिशेब ठेवलेले असतात. अशी संस्था सभासदांच्या हिताचेदृष्टीने योग्य कार्य करीत असते. कारभार अत्यंत कार्यक्षम असतो. याशिवाय " ब " वर्ग म्हणजे मध्यम प्रतिची तर " क " वर्ग म्हणजे अकार्यक्षम आणि " ड " म्हणजे डबघाईस आलेली संस्था असा अर्थ होय.

१९७०-७१ ते १९८५-८६ या पाहणी काळात अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेला प्रत्येक वर्षी ऑडिट वर्ग " अ " मिळालेला आहे. यावरून अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्थेने आपल्या व्यवहारात सहकारी तत्वांचे पालन, सहकारी कायद्यांची अंमलबजावणी, सभासदांच्या हिताचे संरक्षण केले आहे. तसेच संस्थेचे व्यवस्थापन अत्यंत कार्यक्षम आहे हे निदर्शनास येते.

-0-0-0-0-

संदर्भ अंकलखोप विविध कार्यकारी सहकारी संस्था लि.,अंकलखोप
या संस्थेचे वार्षिक अहवाल, आणि कार्यालयीन हिशेब
पुस्तके व कागदपत्रे.